AC – 20.04.2024
Item No. – 5.6 (N) Sem II 1(c)

# As Per NEP 2020

# University of Mumbai

| | |
|---|---|
| **Syllabus for Basket of AEC** | |
| **Board of Studies in Marathi** | |
| **UG First Year Programme** | |
| **Semester** | **II** |
| **Title of Paper** | **Credits** |
| **भाषिक कौशल्यांचे उपयोजन – १ (भाषण व निवेदन कौशल्ये)** | **2** |
| **From the Academic Year** | **2024-25** |

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **Description the course :**<br><br>**Including but Not limited to :** | **भाषिक कौशल्यांचे उपयोजन – १**<br>**(भाषण व निवेदन कौशल्ये)**<br>राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० नुसार पदवीच्या प्रथम वर्षातील एका सत्रात क्षमता विकसन अभ्यासक्रम (Ability Enhancement Course) या शीर्षकांतर्गत आधुनिक भारतीय भाषेचे अध्ययन अनिवार्य करण्यात आले आहे. आधुनिक भारतीय भाषेचा प्रस्तुत अभ्यासक्रम व अध्ययन प्रामुख्याने भाषा क्षमता विकसन केंद्री असावे, असेही या धोरणात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या अभ्यासपत्रिकेच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्यांचा तपशीलवार परिचय करून देणे तसेच ती कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करून देणे अभिप्रेत आहे.<br>या पार्श्वभूमीवर भाषण व निवेदन कौशल्ये या दोन भाषिक कौशल्यांचा परिचय करून देणारी ही अभ्यासपत्रिका आहे. या अभ्यासपत्रिकेच्या अध्ययनातून भाषण व निवेदनाचे स्वरूप, विविध कार्यक्रम व घटना-प्रसंगीची भाषणे व निवेदन, विविध स्वरूपांच्या भाषण व निवेदनाची पूर्वतयारी, त्यासाठी आवश्यक क्षमता व तंत्रांचा व भाषिक-आंगिक-वाचिक कौशल्यांचा परिचय व्हावा, असे अपेक्षित आहे. या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये भाषण व निवेदनाची जाण व क्षमता विकसित होईल, हे लक्षात घेऊन प्रस्तुत अभ्यासपत्रिकेची आखणी करण्यात आली आहे. |
| 2 | **Vertical :** | Ability Enhancement Course |
| 3 | **Type :** | Theory + Practical |
| 4 | **Credit**: | 02 (1 credit = 15 Hours for Theory in a Semester) |
| 5 | **Hours Allotted :** | 30 Hours |
| 6 | **Marks Allotted**: | 50 Marks |
| 7 | **Course Objectives** :<br>१. विविध कार्यक्रम व घटना-प्रसंगीच्या भाषणाचे स्वरूप समजावून सांगणे.<br>२. विविध घटना प्रसंगीच्या निवेदनाचे स्वरूप समजावून सांगणे.<br>३. प्रभावी भाषण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता आणि तंत्रांचा परिचय करून देणे.<br>४. प्रभावी निवेदन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता आणि तंत्रांचा परिचय करून देणे.<br>५. प्रत्यक्ष भाषण आणि निवेदन करण्याची संधी उपलब्ध करून देणे. | |
| 8 | **Course Outcomes** :<br>१. विद्यार्थ्यांना विविध कार्यक्रम व घटना-प्रसंगी करावयाच्या भाषणाचे स्वरूप कळेल.<br>२. विद्यार्थ्यांना विविध कार्यक्रम व घटना-प्रसंगी करावयाच्या निवेदनाचे स्वरूप कळेल.<br>३. विविध कार्यक्रम व घटना-प्रसंगी करावयाच्या भाषणासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता आणि तंत्रांचा विद्यार्थ्यांना परिचय होईल.<br>४. विविध कार्यक्रम व घटना-प्रसंगी करावयाच्या निवेदनासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता आणि तंत्रांचा विद्यार्थ्यांना परिचय होईल.<br>५. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भाषण आणि निवेदन करण्याची संधी उपलब्ध होईल व त्यांच्या क्षमता विकसित होतील. | |

| | | |
|---|---|---|
| 9 | **Modules (अभ्यास घटक) :** | |
| | **Module 1 (घटक- ०१) : भाषण कौशल्य** | |
| | १. भाषण : संकल्पना, भाषण : स्वरूप वैविध्य, भाषण प्रकार.<br>२. भाषण कौशल्याचे उपयोजन : भाषणाची पूर्वतयारी, भाषण संहिता (लिखित व मौखिक), भाषिक-आंगिक-वाचिक कौशल्ये<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन - १) | |
| | **Module 2 (घटक- ०२) : निवेदन कौशल्य** | |
| | १. निवेदन : संकल्पना, निवेदनाचे स्वरूप वैविध्य, निवेदनाचे प्रकार.<br>२. निवेदन कौशल्याचे उपयोजन : निवेदनाची पूर्वतयारी, निवेदन संहिता (लिखित व मौखिक), काल-परिस्थिती भान, भाषिक-वाचिक कौशल्ये.<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन -१) | |
| 10 | **Text Books :** N.A. | |
| 11 | **Reference Books:**<br>१. केळकर अशोक, वैखरी : भाषा आणि भाषाव्यवहार, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०००.<br>२. तौर पृथ्वीराज (संपा०), मराठी भाषिक कौशल्य विकास, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०१८.<br>३. नसिराबादकर ल० रा० व्यावहारिक मराठी, भाषा संशोधन केंद्र, कोल्हापूर, २०२३.<br>४. केळकर अशोक, मध्यमा : भाषा आणि भाषाव्यवहार, *मराठी भाषा आणि वाचिक अभिनय*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९६.<br>५. भाषिक सर्जन आणि उपयोजन, राजन गवस, अरूण शिंदे, गोमटेश्वर पाटील, दर्या प्रकाशन, पुणे, २०१२ | |
| 12 | **Internal Continuous Assessment: 40%** | **External, Semester End Examination 60%**<br>**Individual Passing in Internal and External Examination** |
| 13 | **Continuous Evaluation through:**<br>अंतर्गत मूल्यमापन : २० गुण<br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा / प्रकल्पलेखन, नियत कार्य (Assignment) / सादरीकरण/ प्रश्नमंजूषा<br>उपरोक्त कोणत्याही पद्धतीचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल.<br>(प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन पद्धती) | |
| 14 | **Format of Question Paper: (बहिर्गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप)**<br>बहिर्गत परीक्षा ३० गुण (वेळ एक तास)<br>• एकूण तीन प्रश्न विचारावेत.<br>• प्रत्येक घटकावर अंतर्गत पर्याय असलेले प्रत्येकी १० गुणांचे दोन प्रश्न विचारावेत.<br>• तिसरा प्रश्न हा घटक १ आणि २ वर आधारित दहा गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. | |

| | | |
|---|---|---|
| **Sign of the BOS Chairman**<br>**Name of the Chairman**<br>**Name of the BOS** | **Sign of the Offg. Associate Dean**<br>**Name of the Associate Dean**<br>**Name of the Faculty** | **Sign of the Offg. Dean**<br>**Name of the Offg. Dean**<br>**Name of the Faculty** |